सुधारणा व पुनर्वसन
दुरध्वनी क्र. ०२० २६६८२६६३
ई-मेल-yerwadacp-mh@gov.in

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
अधीक्षक,
येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे.

दि.२६.१०.२०२४.

# प्रेस नोट

## येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे.

### दिवाळी सणानिमित्त कारागृह बंदी निर्मित वस्तुंचे प्रदर्शन व विक्री मेळावा उद्घाटन सोहळा.

मा. प्रशांत बुरडे (भा.पो.से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. डॉ. जालिंदर सुपेकर (भा.पो.से) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संकल्पनेतुन व मा. श्रीमती. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली दिपावली सणानिमित्त **"दिवाळी मेळावा"** कारागृह निर्मित वस्तुंचे विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन मा. श्रीमती. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांचे शुभहस्ते दि.२६.१०.२०२४ रोजी करण्यात आले.

**"सुधारणा व पुनर्वसन"** हे कारागृह विभागाचे ब्रीद असुन कारागृहातील बंदी हा समाजाचा एक घटक असतो. त्यामुळे निश्चितच त्यांच्यामध्ये विविध प्रकारचे उपजत कलागुण असतात व त्यांच्या या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने बंद्यांना कारागृहात विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. त्यानुसार बंद्यांनी तयार केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र कारागृह उद्योग विक्री केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यानूसार विविध सणांचे औचित्य साधुन बंदी निर्मित वस्तुंचे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील दिवाळी सणानिमित्त बंद्यांनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या आकर्षक वस्तुंचे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

सदर विक्री मेळावा व प्रदर्शनामध्ये बंद्यांनी सागवान लाकडापासुन तयार केलेले विविध प्रकारचे फर्निचर, देवघर, शोभेच्या वस्तु, कपडे, हातरुमाल, टॉवेल, बेडशीट, चादरी, बेकरी पदार्थ, बिस्कीट, आकाश कंदील तसेच इतर सर्व दैनंदीन वापराच्या वस्तु उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. प्रदर्शन व विक्री मेळाव्यास सामान्य नागरीकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. सामान्य नागरीकांना अतिशय माफक दरात उच्च दर्जाच्या कारागृह बंदी निर्मित विविध वस्तु उपलब्ध असुन त्याचा लाभ नागरीकांनी घ्यावा, असे आवाहन मा. श्रीमती. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांनी या उद्घाटन कार्यक्रमादरम्यान केले.

सदर कार्यक्रमास श्री सुनिल ढमाळ, अधीक्षक, श्रीमती. पल्लवी कदम, अति. अधीक्षक, डॉ. श्री बी. एन. ढोले, उपअधीक्षक, श्री. आर ई गायकवाड, उपधीक्षक, श्री. मंगेश जगताप, श्री आनंदा कांदे, वरीष्ठ तुरुंगाधिकारी, श्री. सुषमा चव्हाण, कारखाना व्यवस्थापक, श्री. बी एम शिंदे, कारखाना तुरुंगाधिकारी, श्री. सी आर सांगळे, तुरुंगाधिकारी, येरवडा मध्यवर्ती कारागृह व इतर अधिकारी / तांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.


मका
महाराष्ट्र कारागृह


कारागृह उद्योग निर्मित वस्तूंचे
प्रदर्शन व विक्री
येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे-६
CHOICE GROUP
GOODWILL PROJECTS